पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

# प्रेसनोट क्र.५९ दिनांक २०/१०/२०२२

# जनसंवाद अभियानाचे आणखी एक यश, कासा पोलीस ठाणे यांचेकडुन अवैद्य दारु वाहतुक करणा-या आरोपीतावर कारवाई

श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी सुरु केलेल्या जनसंवाद अभियानातंर्गत प्रत्येक पोलीस ठाणे स्तरावर एक गाव एक अंमलदार ही योजना राबविण्यात येत आहे. कासा पोलीस ठाणे हद्दीतील पावन या गावाकरीता पोलीस अंमलदार ११५४ भिमराव शिरसाठ यांची नेमणुक केलेली होती. दिनांक १९/१०/२०२२ रोजी पावन गावातील एका ग्रामस्थानी आयशर टेम्पो क्रमांक एम. एच. ४८ सी. बी. ६८९२ हे वाहन बेवारस उभा असल्याची माहिती पोलीस अंमलदार भिमराव शिरसाठ यास कळविल्याने कासा पोलीस ठाणे नेमणुकीतील पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन सदर बेवारस टेम्पो क्रमांक एम. एच. ४८ सी. बी. ६८९२ चेक केला असता त्यामध्ये प्रोव्हीबिशन गुन्हयाचा माल त्यात देशी व विदेशी दारुचे बॉक्स भरुन विक्री करण्याकरीता विना परवाना बाळगुन वाहतुक करीत असतांना मिळून आले. सदर वाहनातुन खालील प्रमाणे मुद्देमाल मिळुन आला.

१) १३,३७,७२०/- रु. कीमतीची देशी व विदेशी दमन सेलवासा बनावटीच्या दारुच्या विविध प्रकारचे बॉक्स कि. सु.

२) ७,०००/-रु. कि. एक वन प्लस कंपनीचा मोबाईल जु. वा.कि.सु.

३) २०,००,०००/- रु. कि. चा एक नारंगी रंगाचा आयशर कंपनीचा टेम्पो क्र. एम. एच. ४८ सी. बी. ६८९२ जु.वा.कि. सु.

असा एकुण ३३,४४,७२०/- रु. रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर अनोलखी आरोपी यांचे विरुद्ध कासा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.ा २०९/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पोलीस उप निरीक्षक संदीप पाटील नेमणुक कासा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगीरी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्री प्रशांत परदेशी, उप विभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग, श्री. श्रीकांत शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक, कासा पोलीस ठाणे, श्री संदीप पाटील, पोलीस उप निरीक्षक कासा पोलीस ठाणे व कासा पोलीस ठाणे नेमणुकीतील अंमलदार यांनी केलेली आहे.